प्रेसनोट दिनांक २६/०६/२०२४

'' औषध निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन विभाग, पालघर यांचे वतीने लाच घेणाऱ्या खाजगी इसमास'' लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांनी ताब्यात घेतलेबाबत''

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| २ | गुन्हा नोंद कमांक | तुळींज पोलीस ठाणे, जिल्हा पालघर |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७, ७ अ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **१) सौ. आरती शिरीष कांबळी, औषध निरीक्षक, वर्ग–२, पालघर, जि. पालघर सध्या रा. २०४/गुलमोहर अपा. लोकमान्य नगर, कचेरी रोड, पालघर, ता.जि.पालघर**<br>**२) कृष्णकुमार आसाराम तिवारी, वय–५२ वर्षे खाजगी इसम, व्यवसाय–मेडीकल स्टोअर, रा. डी/१०४, साईसदन बिल्डींग,नं. २, अंबावाडी, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर** |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | १,००,०००/–रूपये |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | आरोपी क्र.२ यांनी १,००,०००/–रूपये लाचेची रक्कम स्विकारली. |
| ७ | थोडक्यात हकीगत | यातील आरोपीत लोकसेविका सौ. आरती कांबळे, औषध निरीक्षक, पालघर यांनी दिनांक १४/०६/२०२४ रोजी तक्रारदार यांच्या मालकीच्या मेडीकल स्टोअरची तपासणी केली होती. त्यावेळी तक्रारदाराने त्याच्या मेडीकलमध्ये औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० या कायदया अंतर्गत नियमांचे उल्लंघन केल्याचे दिसून आल्यानंतर तक्रारदाराचे मेडीकल स्टोअर पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्याबाबत त्यांच्या विभागाचे सहायक आयुक्त, औषध परिमंडळ १ यांच्या सहिची नोटीस दिली होती. त्यानंतर तक्रारदाराने त्यांचे मेडीकल स्टोअर बंद ठेवलेले आहे. बंद ठेवलेले मेडिकल स्टोअर परत चालू करण्याकरीता आलोसे सौ. कांबळी यांच्या सांगण्यावरुन आरोपीत नं. २ यांनी तक्रारदाराकडे एक लाख रुपये लाचेची मागणी केली असल्याची तक्रार दि. २१/०६/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.<br>प्राप्त तक्रारनुसार दि. २१/०६/२०२४ व दि. २४/०६/२०२४ रोजी पडताळणी केली असता त्यामध्ये आरोपी नं २ यांनी आलोसे सौ. कांबळी यांच्या वतीने तक्रारदाराकडे १,००,०००/– रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न होवुन त्यास आलोसे न १ सौ. कांबळी यांनी दुजोरा दिल्यानंतर आज रोजी सौ. कांबळे यांच्या सांगण्यावरुन आरोपी नं.२ याने त्याच्या 'दुर्गा मेडीकल स्टोअर' , मोरेगाव, नालासोपारा पूर्व येथे तक्रारदाराकडुन १,००,०००/– रुपयांच्या लाचेची रक्कम स्विकारली असता आरोपी नं २ यास रंगेहात पकडण्यात आलेले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्कपत्ता :–लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघरप. ४०१ ४०४

संकेतस्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई-मेल :–dyspacbpalghar@gmail.com

ऑनलाईनतक्रार :–-

ॲप्लीकेशन :–acbmaharashtra.net

टोलफ्रीनं :–1064

दुरध्वनीकमांक :–02525-297297

व्हॉट्सॲपक :–acbmaharashtra@mahapolice.gov.in

26/6/24

(दयानंद गावडे)

पोलीस उप अधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर